# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

विदयानगर कराड 415 124 जिल्हा - सातारा

फोन नं. (02164) 271711, 272414, 272415 फॅक्स नं. (02164) 271713

वेबसाईट : http://gcekarad.ac.in, ई-मेल: principal@gcekarad.ac.in


**परिपत्रक ( अत्यंत तातडीचे )**

जा.क्रं.शाअमक/आस्था/2020/ 1147 दिनांक :- 17.03.2020

विषय :- कोरोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक **उपाययोजना करणेबाबत...**

संदर्भ :- 1. मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,यांचे पत्र क्रमांक, संकिर्ण — 2020/(प्र.क्र.(60/20)/तांशि-1 दिनांक 13/03/2020

2. मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक 2अ/एडीएम/2020/150 दिनांक 16/03/2020

3. मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे पत्र क्र. तशिविकापु/विवि/सर्वसाधारण/2020/1394 दि.16.03.2020

कोरोना विषाणूच्या (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा 1897 दिनांक 13-03-2020 पासून लागू केलेला असून, त्यातील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून या संस्थेतील सर्व वसतिगृहे दिनांक 31/03/2020 पर्यत बंद राहतील तसेच या संस्थेमधिल अध्यापकांना कळविण्यात येते की, दिनांक 18/03/2020 पासून 25/03/2020 पर्यत घरी राहून कामकाज (Work From Home) करावे. तसेच कोणत्याही अध्यापकानी आपले भ्रमणध्वनी बंद ठेवू नये व मुख्यालय सोडून बाहेरगावी जावू नये अथवा इतरत्र कोठेही फिरू नये. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास/ प्रशासकीय कारणास्तव संस्थाप्रमुखांनी निर्देश दिल्यास अध्यापकांनी संस्थेत तातडीन हजर राहणे बंधनकारक राहील. तसेच निम्नस्वाक्षरीकार, अधिष्ठाता व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नियमितरित्या कार्यालयामध्ये उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

प्र.प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, कराड

प्रत : सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी

2/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास सदर परिपत्रक आणावे. व सदर कालावधीत आपल्या विभागातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना NBA कमिटी तसेच विभागातील कामकाजाबाबत योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.

प्रत : मा.सहसंचालक, तंत्राशिक्षण विभागीय कार्यालय, 412 ई शिवाजीनगर, पुणे-16 यांना माहितीसाठी सविनय सादर.